# नागरिकांची सनद

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | जनतेला पुरविल्या जाणाऱ्या सेवांचा तपशिल | २ |
| ३. | विभागप्रमुखांची यादी | ५ |
| ४. | अधिनस्त कार्यालयांचे पत्ते | ६ |
| ५. | शासन निर्णय/परिपत्रकांबाबत माहिती | ७ |

# प्रस्तावना

भारतातील महानगरांपैकी एक शहर ठाणे असलेला ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील औद्योगिक दृष्टया तिसऱ्या क्रमांकावरील प्रगत जिल्हा आहे. २८ किलोमिटरचा समुद्र किणारा लाभलेल्या कोकणाच्या उत्तरेस, सह्याद्रीच्या पश्चिमेस, अरबी समुद्राच्या पुर्वेस तसेच भारताची आर्थिक राजधानी मानल्या जाणाऱ्या मुंबईच्या उत्तरेस ठाणे जिल्हा प्रस्थापित आहे. ठाणे, भिवंडी-निजामपुरा, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर या तीन मोठ्या महानगरपालिका तसेच अंबरनाथ-बदलापुर नगरपरिषदा ठाणे आयुक्तालयात सामावलेल्या असून प्रत्येक महानगरपालिकेची स्वतःची स्वतंत्र अशी परिवहन सेवा कार्यान्वित आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात रिंगरुट प्रकल्पांतर्गत विविध ठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु असून बरेच जुन्या मार्गांचे नुतनीकरण करुन नवे मार्गही प्रस्थावित करण्यात आलेले आहेत.

ठाणे जिल्ह्याचा आर्थिक, सामाजिक विकास हा मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणामुळे झालेला आहे. सुकर सुरळीत व जलद वाहतूक व्यवस्था यामुळे जिल्ह्यातील उद्योगधंदे समृध्द झालेले आहेत. वाहतूक व्यवस्थेमुळे रसायने, औषधे, प्लास्टिकच्या वस्तू, लोखंडी वस्तू तसेच भिवंडी स्थित पॉवरलूम फॅब्रिक उत्पादन तसेच अंबरनाथ येथील केंद्र पुरस्कृत दारुगोळा शस्त्रास्त्रे कारखाना, ठाणे, मुंब्रा, घोडबंदर येथील वाळू उत्खनन व्यावसाय व इतर अनेक छोट्या मोठया व्यावसायांना दळणवळणाची गती प्राप्त झालेली आहे.

ठाणे जिल्ह्याच्या ४,२१४ किलोमीटर क्षेत्रफळात सन २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या १,१०,६०,००० आहे. १८ आमदार व ३ खासदार व प्रचंड मोठी लोकसंख्या लाभलेल्या या ठाणे आयुक्तालयाची कायदा व सुव्यवस्थेची धुरा ठाणे शहराचे अवघे ८,००० पोलीस सांभाळत आहेत. पैकी केवळ ७०० पोलीस संपुर्ण आयुक्तालयातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राखणेकामी अहोरात्र कार्यरत आहेत.

भारताची आर्थिक राजधानी मुंबई कडे जाणाऱ्या व मुंबई मधून गुजरात, नाशिक, पुणे, व नवी मुंबई कडे जाणारे-येणारे सर्व महामार्ग ठाणे आयुक्तालयातून जातात. औद्योगिक प्रगतीमुळे मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक त्याहीपेक्षा सन २०१९-२०-२१ दरम्यान कोरोना प्रादुर्भावामुळे लोकांची खाजगी वाहनाकडे वाढलेली ओढ लक्षात घेता, लोकसंख्येप्रमाणे वाहनांच्या संख्येतही प्रचंड मोठी वाढ झालेली आहे. याच वाढीचा परिणाम सामन्य जनतेच्या नित्यजीवन शैलीवर होऊ नये या करिता, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतूक विभागातील वाहतूक पोलीस सदैव तत्परतेने अविरत काम करत आहेत. वाहतूक नियमनाव्यतिरिक्त जनतेच्या सुविधेकरिता वाहतूक विभागाकडून पुढील प्रमाणे इतर सेवा पुरविण्यात येत आहेत.

# जनतेला पुरविल्या जाणाऱ्या सेवांचा तपशील

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या शहर वाहतूक विभागामध्ये कार्यरत विविध शाखा/विभागांकडून दैनंदिन कामकाजाव्यातिरिक्त जनतेकरिता विविध सेवा सुविधा पुरविण्यात येतात. त्या पुढील प्रमाणे

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर यांची नागरिकांना भेटण्याची वेळः-

कार्यालयीन दिवशी सांय **१६:००** ते **१८:००** वा पावेतो

**अ) <u>अर्ज शाखा :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

**१)** ग्रिव्हियंस रेड्रेसल पोर्टल/आपले सरकार व ई मेल या पोर्टलद्वारे ऑनलाईन प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींच्या स्वरुपानुसार वर्गीकरण करुन संबंधीत वाहतूक उप विभाग किंवा कार्यालयास सदर तक्रारी वर्ग करण्यात येतात. तसेच सदर अर्जांचा पाठपुरावा करुन संबंधीत कार्यालयाकडून अहवाल प्राप्त करुन घेऊन ऑनलाईन अर्जदारास २१ दिवसात तसेच प्रत्यक्ष प्राप्त अर्जाबाबत ७ दिवसात कार्यवाई बाबत अर्जदारास अवगत करण्यात येते.

**२)** वरिष्ठ कार्यालय अर्ज, स्थानिक अर्ज, ई-मेलवरील अर्ज, अशा दैनंदिन अर्जांची नोंद अर्ज रजिस्टरमध्ये घेण्यात येऊन, अर्जांची निर्गती करण्यात येऊन अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन अर्ज दफ्तरी दाखल वैगेरे बाबतच्या नोंदी नोंद रजिस्टर मध्ये जनत करुन ठेवण्यात येतात.

**३)** सहायक पोलीस आयुक्त यांची ०५ कार्यालये, ०१ प्रशासन कार्यालय, १८ वाहतूक उप विभाग व नियंत्रण कक्ष तसेच नागरिकांकडून प्रत्यक्ष प्राप्त अर्ज, परवानग्या याव्यतिरीक्त महत्वाची कागदपत्रे, अहवाल, संदेश यांचा योग्य समन्वय साधून संबंधीत कार्यालयास माहिती पुरविणे व आवक जावक केल्याच्या नोंदी घेणे व नोंदवही अद्यावत व जतन करुन ठेवणे. इत्यादी प्रकारच्या सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

**ब) <u>प्रशासन विभाग :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

**१)** शाळा, कॉलेजेस मध्ये वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते.

**२)** शाळा, कॉलेजेस मध्ये रस्ता सुरक्षा अभियान घेऊन विविध विषयांवर स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

**३)** मुख्य रस्त्यावर सिग्नलच्या ठिकाणी वाहन चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्यासंदर्भात जनजागृती करण्यात येते.

**क) <u>सहायक पोलीस आयुक्त यांचे कार्यालय :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

सहायक पोलीस आयुक्त कार्यालयाकडून वाहतूकीच्या दृष्टीने पुढील प्रमाणे ना हरकत परवानग्या दिल्या जातात

१) सभा, मेळावे, उपोषण या करिता तात्पुरत्या स्वरुपात मंडप/स्टेज उभारणी करिता नाहरकत देण्यात येते.

२) मिरवणुकीच्या दृष्टीने मिरवणूक मार्गाची पाहणी करुन योग्य मार्गाची आखणी करुन नाहरकत परवानगी देणे.

३) सर्व धार्मीक सण, उत्सव, पुजा, नमाज पठण, महाआरती वगैरे करिता प्रार्थनास्थळांची पाहणी करुन सुलभ वाहतूकीस अडथळा नो होता कार्यक्रमांकरिता जागेचे नियोजन करणे व त्या अनुषंगाने नाहरकत देणे.

४) विविध शासकीय, निमशासकीय, अशासकीय तसेच विविध खाजगी संस्था, संघटनांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या मोटार सायकल रॅली, सायकल रॅली, मॅरेथॉन स्पर्धा, पदयात्रा, जनजागृती संदर्भात कार्यक्रम यांच्या मार्गाची/जागेची पाहणी करुन योग्य मार्गाची आखणी करणे व त्या करिता वाहतूक विभागाकडून ना हरकत देणे.

५) जाहिरात फलक लावणे करिता सुलभ वाहतूकीस अडथळा होणार नाही तसेच सदर जाहिरात फलकामुळे सिग्नल व इतर तांत्रीक बाबींमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही याबाबत योग्य ती काळजी घेऊन खात्री करुन नाहरकत दिली जाते.

६) सीएनजी पंप उभारणी तसेच एफएल ३ सारख्या अस्थापना उभारणी करिता सुनियोजित पार्किंग व्यवस्था उपलब्ध असलेबाबत योग्य ती खात्री केल्यानंतर नाहरकत देण्यात येते.

७) जन माहिती अधिकारी म्हणून केंद्रिय माहिती अधिकारामध्ये प्राप्त अर्जांबाबत अर्जदारास योग्य ती माहिती पुरविणे तसेच इतर तक्रारी अर्जांची शहानिशा करुन निर्गती करणे.

**ड) <u>नियंत्रण कक्ष :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

१) www.thanetrafficpolice.org या संकेतस्थळावर व हेल्प लाईन क्र ८२८६३००३०० व ८२८६४००४०० या संपर्क क्रमांकावर नागरिकांकडून वाहतूक कोंडी, अपघात, नो पार्किंग, बाबत विविध माहिती कळविली जाते. त्याअनुषंगाने तात्काळ संबंधीत वाहतूक उप विभागास संपर्क साधून नागरिकांच्या अडचणींचे निवारण केले जाते.

२) नागरिकांडून सोशल मिडीयाद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारींचेही याच पध्दतीने शक्य तितक्या लवकर निवारण केले जाते.

३) गुगल मॅपद्वारे संपुर्ण ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतूकीवर लक्ष ठेवले जाते. ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी दिसुन येते त्या ठिकाणचे वाहतूक उप विभागास तात्काळ संपर्क साधून वाहतूक कोंडी काढण्यात येते.

४) बिनतारी संदेश यंत्रणेद्वारे ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व घटक, वाहतूक उपविभाग, अधिकारी/अंमलदार यांचेशी तात्काळ संपर्क साधून व्हिआयपी मुव्हमेंटस्, ग्रीन कॉरिडॉर, आपातकालीन मुव्हमेंटस् व इतर माहितीची अंमलबजावणी करण्यात येते.

**इ) <u>ग्रिव्हियंस सेल :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

१) नागरिकांच्या वाहनांवर तांत्रिक चुकीमुळे होणाऱ्या चलनांची खात्री करुन त्यात दुरुस्ती करणे करिता सादर करणे

२) शासन निर्मीत महाट्रॅफिक या ॲप्लीकेशनद्वारे नागरिकांना घरबसल्या त्यांचे मोबईलवरुन त्यांचे आसपास घडणाऱ्या वाहतूक कायद्याच्या उल्लंघनाबाबत वाहतूक विभागास अवगत करणे सोईचे झालेले आहे. तसेच त्यांचे वाहनाकडून होणाऱ्या उल्लघनाबाबत निर्गमीत केलेल्या चलनाची तसेच पेंडींग चलनाची संपुर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते. तसेच सदर चलनांचा भरणाही तात्काळ ऑनलाईन पध्दतीनेच करता येतो.

३) एकाच क्रमांकाची दोन वाहने मिळून येत असतील तर चुकीच्या वाहनांवर तात्काळ कारवाई होणेसाठी तसेच मिळेल त्या ठिकणी सदर वाहन जप्त करुन ताब्यात घेण्यासाठी व्हेईकल अलर्ट जारी करण्यात येतो. त्यामुळे सदर डूयुप्लीकेट नंबरच्या आधारे पुढील घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालता येतो.

४) महाट्रॅफिक ॲपद्वारे प्राप्त तक्रारींचे तसेच समक्ष या कार्यालयात भेट देणाऱ्या नागरिकांचे लवकरात लवकर निराकरण करण्यावर भर देण्यात येतो.

५) माहिती अधिकारामध्ये मागणी करण्यात येणारी माहिती विहित मुदतीत अर्जदारास पुरविण्यात येऊन पुरविण्यात येणाऱ्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यास त्यास प्रथम अपिल व नंतर द्वितीय अपिल करण्यास कळविण्यात येते.

६) नागरिकांच्या वाहनांवर मोठ्याप्रमाणात पेंडींग असलेल्या चलनाचा भरणा करण्याकरिता वाहतूक विभाग व मा. न्यायालय यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या लोकअदालती मध्ये पेंडींग चलनामध्ये तडजोड करुन चलनाचा भरणा करुन घेतला जातो.

**फ) <u>सांखिकी विभाग :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

**१)** कसुरदार वाहनांवर वाहन चालकांवर करण्यात येणाऱ्या सर्व कारवायांबाबत संख्यात्मक माहिती जतन करुन ठेवण्यात येते.

**२)** अपघातांची संख्या, कारणे प्रकारची संख्यात्मक माहिती जतन करुन ठेवण्यात येते.

**३)** कोणत्या कलमाखाली किती केसेस करण्यात आलेल्या आहेत याची तुलनात्म माहिती या विभागाकडे जतन करण्यात येते.

**४)** माहिती अधिकारामध्ये मागणी करण्यात येणारी संख्यात्मक माहिती उपलब्ध करुन देण्यात येते.

**ग) <u>परवाना शाखा :- या शाखेकडून नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या सेवा</u>**

**१)** रस्ते खोदकाम, हॉटेल्सचे एफएल ३, पेट्रोलियम पदार्थ, गॅस व सल्फर साठा, जाहिरात फलक, धार्मिक स्थळे, पुतळा उभारणी करमणूक केंद्रे, व चित्रीकरण या विषयांकरिता वाहतूकीचे दृष्टीने ना हरकत देण्यात येते.

# विभाग प्रमुखांची यादी

| अधिकारी निर्देशिका, वाहतुक विभाग, ठाणे शहर | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नाव** | **प्रभारी अधिकारी यांचे नाव** | **फोन/मोबा.क्र.** | **ईमेल आयडी** |
| १ | **शहर वाहतुक विभाग, ठाणे शहर** | **पोउपआ/ श्री.विनयकुमार राठोड** | ९९८७४२४१००<br>०२२-२५४०१०५६ | cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in |
| | | | | |
| १ | **ठाणे विभाग** | सपोआ/विजयसिंह भोसले | ९९६७४३९९९७ | cp.thane.acptrthane@mahapolice.gov.in |
| २ | **भिवंडी विभाग** | सपोआ/अनिल वाघमारे | ८०९७०९१९६६ | cp.thane.acptrbhiwandi@mahapolice.gov.in |
| ३ | **कल्याण विभाग** | सपोआ/संजय साबळे | ८६९३८४९९०० | cp.thane.acptrkalyan@mahapolice.gov.in |
| ४ | **उल्हासनगर विभाग** | सपोआ/विजय पोवार | ९००४९५५०३९ | cp.thane.acptrulhas@mahapolice.gov.in |
| ५ | **वागळे विभाग** | सपोआ/अनिल घेरडीकर | ९८६०९८९४५० | acpwagletraffic@gmail.com |
| | | | | |
| १ | ठाणे नगर उप विभाग | पोनि/भारत तुकाराम चौधरी | ९६६५२९२९४५ | cp.thane.dcptrthane@mahapolice.gov.in |
| २ | नौपाडा उप विभाग | पोनि/रामचंद्र काशीनाथ मोहीते | ७५०७०००००९५ | cp.thane.dcptrnaupada@mahapolice.gov.in |
| ३ | कळवा उप विभाग | पोनि/विजय रघुनाथ पुराणिक | ९८२३२२६१४५ | cp.thane.dcptrkalawa@mahapolice.gov.in |
| ४ | राबोडी उप विभाग | पोनि/विजय रघुनाथ गायकवाड | ९८७०११७८११ | cp.thane.dcptrrabodi@mahapolice.gov.in |
| ५ | मुंब्रा उप विभाग | पोनि/कृष्णदेव खराडे | ८६९२०१५९९९ | cp.thane.dcptrmumbra@mahapolice.gov.in |
| ६ | भिवंडी उप विभाग | पोनि/मनिष विनायकराव पाटील | ९८७०५६७६८६ | cp.thane.dcptrbhiwadi@mahapolice.gov.in |
| ७ | नारपोली उप विभाग | पोनि/श्रीकांत भगीरथ सोंडे | ९१६७४९९०५४ | cp.thane.dcptrnarpoli@mahapolice.gov.in |
| ८ | कोनगाव उप विभाग | पोनि/सुधाकर शंकर यादव | ८१०८७७०७७० | cp.thane.dcptrkongaon@mahapolice.gov.in |
| ९ | कल्याण उप विभाग | पोनि/राजेश सदाशिव शिरसाठ | ९९२३२०६८७० | cp.thane.dcptrkalyan@mahapolice.gov.in |
| १० | डोबिंवली उप विभाग | पोनि/गिरीश गणपत बने | ९८२१८७७८२९ | cp.thane.dcptrdombvali@mahapolice.gov.in |
| ११ | कोळसेवाडी उप विभाग | पोनि/सचिन सुधाकर सांडभोर | ९८२१५६०३८० | cp.thane.dcptrkolsewadi@mahapolice.gov.in |
| १२ | उल्हासनगर उप विभाग | पोनि/अविनाश भामरे | ८८८८८२४५९९ | cp.thane.dcptrulhas@mahapolice.gov.in |
| १३ | विठठ्लवाडी उप विभाग | पोनि/सुधाकर बापु खोत | ८८८८९४१००० | cp.thane.dcptrvitthalw@mahapolice.gov.in |
| १४ | अंबरनाथ उप विभाग | पोनि/सुदेश वंसत आजगांवकर | ९८२०१७००४१ | cp.thane.dcptrambarnth@mahapolice.gov.in |
| १५ | कोपरी उप विभाग | पोनि/वैशाली रासकर | ८४२४९६३४१४ | cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in |
| १६ | वागळे उप विभाग | पोनि/रविंद्र अंबुजी वाणी | ९८२१२०९०६८ | cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in |
| १७ | कापुरबावडी उप विभाग | मपोनि/मंजुषा अरविंद भोंगळे | ८६५२४५४१४१ | cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in |
| १८ | कासारवडवली उप विभाग | पोनि/जितेंद्र रामनारायण राठोड | ९८२१५९७५६७ | cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in |
| १९ | वाहतुक नियत्रंण कक्ष ठाणे | पोनि/महेश आत्माराम पाटील<br>पोनि/आप्पासाहेब नानासाहेब जानकर | ९९२३१९५२३१<br>९७०२३४४९५४ | — |
| २० | प्रशासन, वाहतुक नियत्रंण कक्ष, ठाणे | पोनि/ज्ञानेश्वर श्रीराम आव्हाड | ८८८८८५७२२१ | — |

# आधिनस्त कार्यालयांचे पत्ते

| अ.क्र | वाहतुक उप विभागाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १ | पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग | तिनहात नाका, एल.बी.एस मार्ग,नौपाडा, ठाणे |
| २ | स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग | तिनहात नाका, एल.बी.एस मार्ग,नौपाडा, ठाणे |
| ३ | स.पो.आ. वागळे वाहतूक विभाग | तिनहात नाका, एल.बी.एस मार्ग,नौपाडा, ठाणे |
| ४ | स.पो.आ. भिवंडी वाहतूक विभाग | जुने पोउपआ परि.२कार्यालय, तहसील कार्यालयाशेजारी भिवंडी |
| ५ | स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग | आलीशान टॉवर, लुडस चर्चच्या मागे, कर्णिक रोड, कल्याण प |
| ६ | स.पो.आ. उल्हासनगर वाहतूक विभाग | उल्हासनगर पो.स्टे. समोर, १ नंबर बस स्टॉप जवळ उल्हासनगर |
| ७ | पोलीस निरीक्षक, प्रशासन | तिनहात नाका, एल.बी.एस मार्ग,नौपाडा, ठाणे |
| ८ | ठाणेनगर, वाहतूक उपशाखा | पोलीस परेड मैदान, मुख्यालयाचे बाजूला, कोर्ट नाका, ठाणे प. |
| ९ | नौपाडा, वाहतूक उपशाखा | तिन हात नाका उड्डानपुलाचे खाली, ठाणे प. |
| १० | राबोडी, वाहतूक उपशाखा | राबोडी सर्कल, साकेत रोड, ठाणे प. |
| , ११ | कळवा, वाहतूक उपशाखा | कृष्ण मंदिराचे बाजूला, विटावा, बेलापूर रोड, कळवा ठाणे प. |
| १२ | मुंब्रा, वाहतूक उपशाखा | नारायण नगर, मॅट कंपनी समोर, मुंब्रा पो.स्टे. बाजूला मुंब्रा |
| १३ | कोपरी, वाहतूक उपशाखा | व्टिन्स हॉटेल समोर, १० नं. प्लॅटफॉर्म शेजारी, ठाणे पुर्व |
| १४ | वागळे, वाहतूक उपशाखा | नितीन कंपनी उड्डानपुलाचे खाली, ठाणे प. |
| १५ | कापुरबावडी, वाहतूक उपशाखा | माजिवाडा उड्डानपुला खाली, जुना आग्रा रोड, ठाणे प. |
| १६ | कासारवडवली, वाहतूक उपशाखा | वघबीळ उड्डानपुला खाली, घोडबंदर रोड. ठाणे प. |
| १७ | भिवंडी, वाहतूक उपशाखा | रामेश्वर मंदिरासमोर, टिपटॉप हॉटेल शेजारी, भिवंडी पुर्व |
| १८ | नारपोली, वाहतूक उपशाखा | अनमोल टेक्सटाईल्स समोर, आंजूरफाटा, नारपोली, भिवंडी |
| १९ | कोनगाव, वाहतूक उपशाखा | रांजनोली नाका, कल्याण भिवंडी बायपास, भिवंडी |
| २० | कल्याण, वाहतूक उपशाखा | कल्याण कोर्टाच्यामागे, बीएसएनएल बाजूला, कल्याण प. |
| २१ | कोळशेवाडी, वाहतूक उपशाखा | गोपाळ कृष्ण नगर, चक्कीनाका, कल्याण पुर्व |
| २२ | डोंबीवली, वाहतूक उपशाखा | डोंबिवली पो.स्टे. बाजूल, रामनगर, डोंबिवली पुर्व |
| २३ | उल्हासनगर, वाहतूक उपशाखा | उल्हासनगर पो.स्टे. समोर, १नं. बस स्टॉप, शहाड, उल्हासनगर |
| २४ | विठ्ठलवाडी, वाहतूक उपशाखा | ओटी नं. ४, विठ्ठलवाडी पो.स्टे.च्या बाजूला, उल्हासनगर ४ |
| २५ | अंबरनाथ, वाहतूक उपशाखा | अंबरनाथ नगरपरिषदेच्या बाजूला, पोलीस लाईन, अंबरनाथ प. |

# शासन निर्णय व परिपत्रके

| |
|---|
| **नागरीकांना कामाच्या तासांसह माहिती मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा** |
| **नागरीकांसाठी भेटण्याची वेळ** |
| पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर. कार्यालयीन वेळेत ०४:०० वा ते ०६:०० वा |
| **संकेतस्थळ** |
| www.thanetrafficpolice.org<br>www.thanepolice.maharashtra.gov.in,<br>cp.thane.crotraffic@mahapolice.gov.in |
| **माहितीसाठी संपर्क** |
| वाहतूक हेल्पलाईन क्र. :— +९१८२८६४००४००, +९१८२८६३००३०० |
| **नागरीकांसाठी सर्व प्रकारचे सुविधा शासन निर्णय तसेच परिपत्रके N.O.C बाबतची माहिती खालील संकेत स्थळावर प्रसिध्द करणयात येते.** |
| www.thanetrafficpolice.org<br><br>www.thanepolice.maharashtra.gov.in<br><br>cp.thane.crotraffic@mahapolice.gov.in |